भारतीय जनता पार्टी

**प्रभाग क्र. २५**
शनिवार पेठ - महात्मा फुले मंडई

# कर्तृत्व, नेतृत्व! दातृत्व,



# राघवेंद्र बाप्पु मानकर

**सरचिटणीस,** भाजपा पुणे शहर,
**मा. संपर्कप्रमुख,** भाजयुमो पुणे शहर,
**मा. शहर अध्यक्ष,** भाजयुमो पुणे शहर

निरंतर प्रयास समर्पित सेवेचा, निर्धार शाश्वत विकासाचा।

# भारताचे विकास पुरुष


महा मेट्रो
PUNE METRO
पुणे मेट्रो
Hinjawadi Metro Project
PMPML
UDAN
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना
स्व. मा. खा. गिरीश बापट
PET-CT & DIAGNOSTIC CENTER
Pradhan Mantri mudra Yojna
28
Highest Civilian Awards
and still counting
प्रधानमंत्री जन-धन योजना
मेरा खाता भाग्य विधाता
ARTICLE 370
JICA
उज्ज्वला
प्रधानमंत्री आवास योजना
24x7
पाणी पुरवठा योजना
G20
Pune Ring Road
Bharatratna Atalbihari Vajpayee Medical College
PUNE METROPOLIS
PUNE Riverfront Project
OPERATION SINDOOR
Pune GRAND TOUR
ATAL SETU
मन की बात
प्रधानमंत्री जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत
PM-JAY
MAKE IN INDIA

# आपले आदर्श





आदर्श कार्य तुमचे ठरले,
जणू दीपस्तंभ जनसेवेचे...

# माझे मार्गदर्शक

बळ पंखांना तुम्हीच दिले,
सदैव उंच गगन भरारीचे...









प्रभाग क्र. २५ शनिवार पेठ महात्मा फुले मंडई

२४x७ जनसेवा कार्यालय

# ध्यास अंत्योदयाचा, विचार 'राष्ट्रप्रथम'चा,
# मूलमंत्र समर्थ भारताचा !

भाजपा

**प्रिय मतदार बंधू भगिनींनो,**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक संपन्न होत आहे. **लोकशाहीच्या या उत्सवामध्ये** आपण सर्वजण मतदानाचा हक्क बजावून आपल्या भागाचे लोकप्रतिनिधी महानगरपालिकेमध्ये पाठवून सर्वांगीण विकासाचा पाया रचण्याचे महान कार्य करणार आहात. भारतीय जनता पक्षाचा **अधिकृत उमेदवार** म्हणून मी या निवडणुकीत उभा आहे.

माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, गृहमंत्री अमितभाई शहा, भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष नितीनजी नबीन यांच्या दूरदृष्टीने आणि समर्थ नेतृत्वाने देशाचा होत असलेला **जागतिक पातळीवरील विकास**, माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्रजी चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री मा. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या सक्षम नेतृत्वाने महाराष्ट्र राज्याचा होत असलेला **सर्वांगीण विकास** आपण सर्वजण जाणताच.

हाच विकास आराखडा डोळ्यांसमोर ठेवून पुणे शहराचे लोकप्रिय खासदार, केंद्रीय मंत्री मा. मुरलीधरआण्णा मोहोळ, महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.आ. चंद्रकांतदादा पाटील, आमदार माधुरीताई मिसाळ, आमदार हेमंतभाऊ रासने आणि शहर अध्यक्ष धिरजजी घाटे यांनी पुणे शहराचे प्रतिनिधित्व करत **पुणे शहराला जलद गतीने प्रगतीपथावर** नेले आहे.

या सर्व आदर्श नेतृत्वांचे कार्य डोळ्यांसमोर ठेवूनच मी प्रभाग क्र. २५ च्या विकासाचा आराखडा तयार केला आहे. **'सेवा है यज्ञ कुंड समिधा सम हम जले'** हा ध्यास उराशी बाळगून मी मागील **दोन दशकांमध्ये सातत्याने काम करत राहिलो**, विविध कामांच्या माध्यमातून आपण सर्वजण सातत्याने भेटलो आहोतच. सर्वप्रथम राष्ट्र, मग पक्ष आणि नंतर स्वतः या भारतीय जनता पक्षाच्या संस्कारात मी वाढलो आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेचे संस्कार माझ्यावर घडत राहिले. युवकांच्या प्रश्नांसाठी **संघर्ष करताना**, जनतेच्या **हक्कांसाठी लढताना** माझ्यातील नेतृत्वगुण विकसित होत गेले आणि **'सामाजिक कार्यकर्ता'** ही नवी ओळख मला मिळाली.

एक सच्चा कार्यकर्ता म्हणून **'सेवेसी सदैव तत्पर'** राहण्याचा मी सातत्याने प्रयत्न केला आणि इथून पुढेही करत राहणार. माझ्यातील कार्यकर्ता हा सार्वजनिक गणेशोत्सवातून घडलेला आहे. निंबाळकर तालीम सार्वजनिक गणेशोत्सवातून विविध सामाजिक उपक्रम राबवले. या निमित्ताने समाजाच्या सर्व स्तरातील लोकांशी संपर्क आला. **जनसामान्यांचे प्रश्न समजून घेता आले**, ते प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करता आले. या प्रयत्नांनीच विविध पदांची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळाली. आदरणीय स्वर्गीय खा. गिरीशभाऊ बापट यांच्या मार्गदर्शनाखाली मी राजकीय क्षेत्रात कार्याची मुहूर्तमेढ रोवली. यामध्ये प्रामुख्याने २०१२ पासून बँक

कर्मचारी यांच्यासाठी बँक कर्मचारी संघाच्या माध्यमातून काम करत आहे. स्व. आमदार मुक्ताताई टिळक यांचेही अमूल्य मार्गदर्शन मला वेळोवेळी मिळाले. २०१७ पासून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून राजकीय क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. २०२० साली **भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या पुणे शहराध्यक्ष पदी** निवड झाली. २०२३ आणि २०२५ साली भारतीय जनता पक्ष **पुणे शहर सरचिटणीस पदी निवड** झाली. या सर्व पदांवर काम करताना जनसेवा हा एकमेव ध्यास आहे. शहराध्यक्ष माननीय धीरजजी घाटे आणि माननीय गणेशजी बीडकर यांचे अमूल्य मार्गदर्शन मला वेळोवेळी लाभले आहे.

**'राष्ट्र प्रथम'** हा मूलमंत्र घेऊन मी काम करताना प्रत्येक प्रश्नासाठी लढलो. **स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान** झाला तेव्हा त्याविरोधात **तीव्र आंदोलन** केले, कोरोना काळात **रेमडीसीवीर प्रश्नासाठी आंदोलन** केले. अशा अनेक आंदोलनाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढलो. त्याचसोबत जनसामान्यांना आवश्यक असणारे अनेक लोकोपयोगी उपक्रम मी राबवले. अनेक **शासकीय योजना जनसामान्यांपर्यंत** पोहोचवण्याचे काम केले, कोरोना सारख्या महामारीच्या कठीण काळात गरजू लोकांसाठी सातत्याने खंबीरपणे **सेवाकार्यासाठी** उभा राहिलो. अनाथ मुलांसाठी सातत्याने काम केले. प्रभागातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभलेले अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले.

पुणे महानगरपालिका निवडणुकीला सामोरे जाताना प्रभाग क्रमांक २५ चा **विकास आराखडा** डोळ्यांसमोर ठेवूनच मी सुरुवात केलेली आहे. प्रभाग क्र. २५ मधील प्रत्येक प्रश्नासाठी सातत्याने काम करत असतानाच भविष्यातील अनेक प्रश्नांवर आजच योग्य उत्तर शोधून त्यानुसार **विकासाचा पाया मजबूत** करण्याचा मी निर्धार केला आहे. प्रभाग क्र. २५ ही पुणे शहराची खरी ओळख आहे. त्यामुळे आपल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास साधून **विकासाचे रोल मॉडेल** उभे करण्याचा माझा प्रयत्न आहे. आपला प्रभाग क्रमांक २५ हा महान ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला प्रभाग आहे.

हा वारसा जतन करतानाच उज्ज्वल भविष्याचा पाया मजबूत करणे ही मी **माझी जबाबदारी** समजतो.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची **अंत्योदय** ही संकल्पना सत्यात उरवण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन.

भारतीय जनता पक्षाने प्रभाग क्र. २५ मध्ये भरीव कार्य केलेले आहेच. आता त्यापुढील टप्प्यात

प्रभाग क्र. २५ हा एक आदर्श प्रभाग म्हणून घडवण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील आहे.

गरज आहे ती आपल्या **विश्वासाची आणि खंबीर साथीची.**



आपला विश्वासू,

**राघवेंद्र बाप्पु मानकर**

भाजपा

घडवले ज्या समाजाने मला,
देणे आहे त्या समाजाचे...
सेवा म्हणून केले काम जे,
ते आहे कर्तव्य मानवतेचे...








# कर्तृत्व

ज्या समाजाने आपल्याला घडवले त्या **समाजाचे आपण देणे लागतो** ही भावना मनात कायम ठेवून सामाजिक बांधिलकी जपत जनतेच्या हक्कांसाठी अनेक **आंदोलने** केली, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारे अनेक सांस्कृतिक उपक्रम राबवले, सर्वसामान्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्यासाठी **संघर्ष** केला, अनेक शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून गरजूंना त्याचा लाभ मिळवून दिला.






# रेमडीसीवीरच्या वाढीव दरांविरोधात लढा

प्रभाग क्रमांक २५ मध्ये राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या पुढाकाराने रेमडीसीवीर या जीवनावश्यक **औषधाच्या वाढीव दरांविरोधात** भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून आंदोलन करण्यात आले. कोरोनासारख्या गंभीर आजारात रेमडीसीवीर औषध अत्यंत महत्त्वाचे असताना त्याचे अवाजवी दर **सर्वसामान्य रुग्णांच्या** आवाक्याबाहेर जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या आंदोलनात नागरिक, सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. औषध कंपन्यांनी **दर कमी करावेत** व शासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली.





# स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सन्मानात 'आम्ही सारे' मैदानात

काँग्रेस नेते **राहुल गांधी** यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विरोधात केलेल्या वक्तव्याचा निषेध करत राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी भाजपा च्या सर्व सहकाऱ्यांसोबत **तीव्र आंदोलन** केले. या आंदोलनात भाजपा व भाजयुमोच्या कार्यकर्त्यांसह सावरकरप्रेमी नागरिक सहभागी झाले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या **योगदानाचा आदर** करणे प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे ही भूमिका राघवेंद्र बाप्पू मानकर यांची कायमच आहे.

# ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबीर

प्रभाग २५ मध्ये **ज्येष्ठ नागरिकांच्या** आरोग्यासाठी राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या माध्यमातून वाढदिवस व विशेष दिवसांचे औचित्य साधून, **आरोग्य शिबिरांचे आयोजन** करण्यात येते. मधुमेह तपासणी, रक्त तपासणी यासह ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक साहित्यांचे वाटप माजी नगरसेवक स्व. त्र्यंबकराव आपटे सर यांच्या हस्ते करण्यात येते. यासह ज्येष्ठांना आवश्यक कोणत्याही मदतीसाठी २४ तास जनसेवा कार्यालयाच्या माध्यमातून बाप्पु व त्यांचे सहकारी नेहमी **तत्पर** असतात. आपल्या समाजाचे मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठांचे या समाजात महत्व आहे. त्यांच्या आरोग्यासाठी बाप्पु नेहमी कटीबद्ध असतात.





# 'शासन आपल्या दारी' - शासकीय योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत

प्रभाग क्र. २५ मध्ये राघवेंद्र बाप्पू मानकर यांच्यामार्फत कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंतभाऊ रासने यांच्या वाढदिवसानिमित्त **'शासन आपल्या दारी'** हा उपक्रम राबविला जात आहे. या योजनेअंतर्गत **विविध शासकीय योजना**, जसे की आरोग्य, शिक्षण, आर्थिक मदत, विमा व सामाजिक सुरक्षा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवले जात आहेत. याचा लाभ प्रभागातील प्रत्येक नागरिकाला मिळत आहे. राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या प्रयत्नांमुळे प्रभागातील नागरिकांना शासनाच्या योजनांचा **प्रत्यक्ष फायदा** मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात.

# शिवजयंती खऱ्या अर्थाने सार्वजनिक उत्सव व्हावा, मॉल मल्टिप्लेक्समध्ये साजरा करावा

ज्या उत्साहाने मॉल मल्टिप्लेक्स मध्ये इतर धर्मियांचे उत्सव साजरे केले जातात त्याबद्दल आम्हाला आनंद आहेच. हिंदवी स्वराज्य संस्थापक **छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती** देखील त्याच उत्साहात आणि जल्लोषात साजरी झाली पाहिजे अशी मागणी करणारी मोहीम भाजयुमोच्या माध्यमातून सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने राबविण्यात आली. या मागणीला प्रतिसाद देत शहरातील अनेक **मॉल, मल्टिप्लेक्स, आस्थापना येथे शिवजयंती** साजरी करण्यास सुरुवात झाली.






# शालेय विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी आंदोलन करण्यात आले

कोविड काळात आलेल्या आर्थिक संकटामुळे केवळ फी न भरू शकल्यामुळे किंवा उशिरा भरल्याने कोणताही विद्यार्थी **शिक्षणापासून वंचित** ठेवणाऱ्या शिक्षण संस्थांविरोधात राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माध्यमातून आंदोलन केले. शिक्षण उपसंचालक कार्यालयावर मोर्चा काढून याबाबतचे निवेदन देत **फी माफी व सवलतीची मागणी** करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत हक्कांविषयी वेळोवेळी **लढा** देण्यात आला.

# पाडवा शोभायात्रेचा उत्साहात सोहळा, पारंपरिक सणाला नवी ऊर्जा

प्रभाग क्र. २५ मध्ये गुढी पाडव्याच्या निमित्ताने राघवेंद्र बाप्पु मानकर आणि सहकारी यांच्या संयोजनातून भव्य आणि देखणी पाडवा शोभायात्रा आयोजित करण्यात येते. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि आकर्षक सजावटीमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून जातो. शोभायात्रेदरम्यान सामाजिक एकोपा, सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश देण्यात येतो. प्रभागासह संपूर्ण पुणे शहरात ही शोभायात्रा आकर्षण ठरू लागली आहे. हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी शेकडो नागरिक या शोभायात्रेला शहरातून येतात.






# देव, देश अन् धर्मासाठी..

हिंदुत्व हा आमचा अभिमान आहे. हिंदुत्व हा आमचा प्राण आहे. हिंदुत्वावर आलेले संकट आम्ही उलथवून टाकू. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणारे राघवेंद्र बाप्पु मानकर; हिंदुविरुद्ध झालेल्या हिंदुंवर झालेल्या अन्यायाविरोधात सकल हिंदु समाजाच्या वतीने आयोजित हिंदु जनआक्रोश मोर्चामध्ये, हजारो महिला आणि नागरिक यांच्यासह सहभागी झाले. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी सदैव कटीबद्ध राहण्याचा निर्धार राघवेंद्र बाप्पु मानकर यांचा आहे.

# दीपावली विशेष 'दीपसंध्या'

**सांस्कृतिक आणि परंपरेने समृद्ध** आपल्या प्रभाग २५ मध्ये दीपावलीच्या निमित्ताने राघवेंद्र बाप्पु मानकर मित्र परिवार व ओंकार ग्रुपच्या माध्यमातून **'दिप संध्या'** या दिवाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुमधूर **मराठी गीतांच्या या कार्यक्रमाने** रसिक मंत्रमुग्ध झाले. दीपावलीच्या चैतन्यदायी वातावरणात या कार्यक्रमाने आणखी बहर आणला. या कार्यक्रमास आमदार मा. हेमंतभाऊ रासने, भाजपा कसबा मतदारसंघाचे मंडल अध्यक्ष अमितजी कंक यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.











# 'वंदे मातरम्' गौरव यात्रा..

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांना स्फूर्ती देणारे 'वंदे मातरम्' या गीताला नुकतेच **१५० वर्षे पूर्ण** झाले. त्यानिमित्त वंदे मातरम् गौरव समितीच्या वतीने वंदे मातरम् **गौरव यात्रेचे आयोजन** करण्यात आले होते. या यात्रेच्या नियोजनाची जबाबदारी राघवेंद्र मानकर यांना मिळाली. देशसेवेची संधी देणारी ही जबाबदारी पार पाडत या यात्रेचे **यशस्वी नियोजन** करण्यात आले. हजारो पुणेकर या गौरव यात्रेला उपस्थित होते.

# ट्रॅफिक वॉर्डनची व्यवस्था..

आपल्या पुण्याच्या **मध्यवस्तीत अरुंद रस्त्यांमुळे** वाहतूक कोंडीची समस्या भेडसावते. दिवाळी व लग्नसराईत ही गर्दी आणखी वाढते. यावर उपाय म्हणून, दिवाळी व लग्नसराईच्या काळात आपल्या प्रभागातील स्थानिक नागरिकांना होणारा **वाहतूक कोंडीचा त्रास** टाळण्यासाठी ट्रॅफिक वॉर्डनची व्यवस्था राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या वतीने करण्यात येते. छोट्या रस्त्यावर **वाहतूक नियमन**, वाहतूकीच्या नियमांविषयी जागृकता, अस्ताव्यस्त पार्किंग होऊ नये म्हणून हे वॉर्डन काळजी घेतात.





# लाडक्या लेकींसाठी 'सुकन्या समृद्धी'..

भाजपा पुणे शहर व राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या **'२४ तास जनसेवा कार्यालया'**च्या माध्यमातून आणि भारतीय डाक विभागाच्या सहकार्याने आधार कार्ड, मतदार नोंदणी व **सुकन्या समृद्धी योजनेच्या** शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला व आपल्या लेकींसाठी सुकन्या समृद्धी योजनेची नोंदणी केली. मोदीजींच्या आणखी एका योजनेचा लाभ अनेक लाडक्या लेकीच्या उज्वल भविष्यासाठी व्हावा या हेतूने आयोजित या शिबिरास लाभलेला प्रतिसाद हा **सरकारच्या योजनांवर विश्वास** दर्शवणारा होता.

# आणि अवतरले 'प्रभू श्री रामलल्ला'

शेकडो वर्षांनी प्रभू श्रीरामल्ला आपल्या अयोध्येतील मंदिरात विराजमान झाले. या ऐतिहासिक क्षणाचे स्मरण म्हणून प्रभाग क्र. २५ मधल्या आपल्या सदाशिव पेठ मध्ये **प्रभू श्रीरामलल्ला यांचे भव्य भित्तीचित्र** साकारले. प्रभू श्रीरामल्ला यांचे **महाराष्ट्रातील पहिले सर्वात मोठे** हे चित्र ठरले. या चित्रकामाची सुरुवात ज्येष्ठ कारसेवक अजयजी खोले, कारसेवक शरदराव गंजीवाले, विश्व हिंदू परीषदचे धनंजयजी गायकवाड, पूर्वांचल विकास समितीच्या सौ. संपदा अजयकुमार खोले, श्रीराम नवमी उत्सव समिती ट्रस्ट, पुणेचे विश्वासजी मनेरे यांच्या उपस्थितीत झाली. या भित्तीचित्राचे उद्घाटन मा. रविंद्र वंजारवाडकर आणि मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी भाजप पुणे शहर अध्यक्ष धीरजजी घाटे, कसबा भाग संघचालक प्रशांतजी यादव, ग्राहक पंचायतीचे सूर्यकांतजी पाठक, विश्व हिंदू परिषदेचे किशोरजी चव्हाण, रा. स्व. संघाचे धनंजयजी काळे, रोहितजी टिळक, प्रांत प्रचार मंडळ सदस्य आनंदजी पवार, भाजप कसबा मंडलाध्यक्ष अमितजी कंक हे उपस्थित होते.

प्रसिद्ध चित्रकार निलेश खराडे यांनी साकारलेल्या या चित्राच्या कलाकृतीला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध कलाकार **पद्मश्री वासुदेव कामत सर** यांनी भेट दिली. अयोध्येतील निर्माणाधीन श्रीराम मंदिरासाठी रामलल्ला मूर्तीचे निरीक्षण व त्यासंदर्भातील कलात्मक अभ्यास व पुरावे त्यांनी तयार केले आहेत. तसेच जगप्रसिद्ध भारतीय सुलेखनकार **पद्मश्री अच्युतजी पालव** यांनी भेट दिली. त्याचबरोबरीने मुंबईतील जगप्रसिद्ध सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टचे डीन प्रा. जॉन डगलस सर आणि पुण्यातील प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय चित्रकार रामचंद्र खरटमल सर यांनीही भेट दिली.











# जनसामान्यांचा बुलंद आवाज

महाराष्ट्रातील भ्रष्टाचारी महाविकास आघाडीचे सरकार असो, शरद पवार आणि नाना पटोले यांनी **जनसामान्यांच्या भावना** दुखावणारे केलेले विधान असो, किंवा जनसामान्यांच्या मूलभूत अधिकारांना पोहोचलेला धक्का असो. प्रत्येकवेळी सर्वसामान्यांचा **आवाज बुलंद** करण्यासाठी भारतीय जनता पार्टी खंबीर उभी राहिली. जनतेसाठीच्या प्रत्येक **आंदोलनात सहभागी** होत, या लढ्यात राघवेंद्र बाप्पु मानकर सहभागी झालो.














# कोरोना..

## काळ कसोटीचा,
## निर्धार सेवेचा..

मानवतेच्या सेवेसाठी जनसामान्यांच्या
मदतीसाठी खंबीरपणे उभे राहणे हे कर्तव्य होते.






# आपला प्रभाग, स्वच्छ सुंदर प्रभाग

आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या स्वच्छ सुंदर आणि विकसित कसबा या अभियानाअंतर्गत आपल्या प्रभागात राघवेंद्र बाप्पु मानकर यांच्या माध्यमातून **'मिशन स्वच्छ प्रभाग २५'** हे अभियान राबविण्यात येत आहे.

दररोज विविध परिसराची स्वच्छता, कचरा संकलनासाठी **मोफत डस्ट बिनचे वाटप,** कचरा उचलण्यासाठी घंटागाडी आणि स्वच्छतेविषयक तक्रारी व मदतीसाठी **हेल्पलाईनची सोय** या अभियानाअंतर्गत करण्यात आली आहे. अल्पावधीतच या अभियानाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

स्वच्छ,सुंदर आणि विकसित कसबा हेमंत रासने

MISSION स्वच्छ प्रभाग २५

भाजपा


















# प्रभू आले मंदिरा..

करोडो भारतीयांच्या स्वप्नातील **प्रभू श्रीरामांचे मंदिर** अयोध्येत साकारले गेले. या मंदिराच्या श्रीरामलल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा **आनंदोत्सव** आपल्या प्रभाग २५ मध्ये करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कारसेवकांच्या कुटुंबियांच्या हस्ते प्रभू श्रीरामांची आरती, भव्य मिरवणूक, प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपण, दीपोत्सव अशा **कार्यक्रमांचे आयोजन** प्रभागात करण्यात आले होते. प्रभू श्रीरामांच्या जयघोषात अबाल वृध्द, महिला, शेकडो युवकांनी हा सोहळा साजरा केला. यावेळी प्रभू श्रीरामांची आरती व प्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते.






# युवकांच्या मनातील गणेशोत्सव..

**पुण्याच्या वैभवशाली गणेशोत्सव** हा आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीची शान आहे. या गणेशोत्सवाची परंपरा कायम ठेवणारे युवा कार्यकर्ते यांना प्रशासनाशी संवाद साधता यावा व प्रशासनलाही या कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभावे या हेतूने राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी **'युवकांच्या मनातील गणेशोत्सव'** ही अनोखी संकल्पना राबवली. युवा कार्यकर्त्यांचा पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद घडविणाऱ्या या कार्यक्रमाला शहराच्या मध्यवस्तीतील गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी **मोठ्या संख्येने हजेरी** लावली होती.

अन्यायाच्या आव्हानांना,
देऊ सदैव सडेतोड उत्तर...
जनसामान्यांच्या प्रगतीसाठी,
कर्तव्यासी राहू सदैव तत्पर...





# नेतृत्व



समाजातील कोणत्याही घटकांवर होणारा **अन्याय** हा माझ्या कुटुंबावर होणारा अन्याय आहे असे समजून त्या अन्यायाविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्यास मी सदैव तयार आहे. जनसामान्यांच्या **हितासाठी सदैव तत्पर** राहून शाश्वत विकासाचा पाय मजबूत करणे हेच माझे कर्तव्य आहे असे मी मानतो. आपल्या प्रभागाचा **उज्ज्वल भविष्याचा** विचार करून शाश्वत विकास साधायचा आहे. आपला प्रभाग हा एक आदर्श प्रभाग म्हणून घडवायचा आहे.





# राष्ट्र प्रथम हा संस्कार कायम जपूया, तिरंगा प्रत्येक घरावर अभिमानाने फडकवूया !

देशाच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंग्याच्या सन्मानार्थ **'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव'** या अभियाना अंतर्गत देशभक्तीचा जागर करण्यासाठी **तिरंगा रॅलीचे** आयोजन करण्यात आले. केंद्रीय मंत्री मा. मुरलीधर अण्णा मोहोळ, शहराध्यक्ष धीरजजी घाटे, मा. आमदार जगदीशजी मुळीक यांच्यासह शेकडो नागरिक या रॅलीत सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे भाजयुमोतर्फेही विविध **उपक्रमांचे आयोजन** करण्यात आले होते.





# मोदी सरकारची यशस्वी ८ वर्षे

देशाचे कर्मयोगी **पंतप्रधान नरेंद्रजी मोदी** यांच्या कार्यकाळाला ८ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त **'सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण'** हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात केले होते. केंद्रीय मंत्री मा. राजीवजी चंद्रशेखर यांच्या 'युवासंवाद' कार्यक्रम यावेळी मॉडर्न महाविद्यालय येथे घेण्यात आला. मा. आमदार जगदीशजी मुळीक व मा. राजेशजी पांडे यांच्या उपस्थितीत पुणे शहरात युवकांच्या **बाईक रॅलीचे आयोजन** करण्यात आले.

# सन्मान अर्थव्यवस्थेच्या पाईकांचा..

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या कणा असणारे राष्ट्रीय, सहकारी आणि खाजगी **बँकेचे कर्मचारी** यांच्या सन्मानाची अनोखी संकल्पना मांडण्यात आली. कोरोना काळात अव्याहतपणे काम करून देशाचे **अर्थकारण** चालते ठेवणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांचा **सन्मान** देशाचे तत्कालीन अर्थराज्यमंत्री भागवतजी कराड यांच्यासह, दिवंगत खासदार गिरीशजी बापट, पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील, शहराध्यक्ष धीरजजी घाटे, राजेशजी पांडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.





# प्रत्येकाच्या आरोग्याची काळजी घेऊया, सुदृढ सक्षम उज्ज्वल राष्ट्र घडवूया

देशाच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून प्रभाग २५ मधील सर्व वयोगटातील नागरिकांसाठी **मोफत आरोग्य शिबिराचे** आयोजन करण्यात आले. कसबा मतदार संघाचे आमदार मा. हेमंतजी रासने यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या नागरिकांचा **उत्स्फूर्त प्रतिसाद** लाभला. प्रतिबंधात्मक **आरोग्य तपासणीने** आजारांचा धोका वेळीच ओळखता येतो. त्यामुळे मधुमेह, बीपी, बीएमआय यासारख्या तपासण्या या शिबिरात करण्यात आल्या.

# सक्षम भारत सुरक्षित भारत
# देशाने ओलांडला 100 कोटी लसीकरणाचा टप्पा...

कोविड **लसीकरणाचा १०० कोटींचा** टप्पा पूर्ण झाला तेव्हा भारतीय जनता युवा मोर्चा कसबा मतदारसंघाच्या वतीने **दीपोत्सव आणि कृतज्ञता** सोहळा तत्कालीन शहराध्यक्ष मा. आमदार जगदीशजी मुळीक यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. आरोग्याच्या दृष्टीने आपला **देश सक्षम आणि सुरक्षित** आहे हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.















# पदवीधर निवडणूकीत सक्रीय सहभाग

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा **शहराध्यक्ष** असताना पदवीधर मतदारसंघ निवडणूकीमध्ये सक्रीय सहभाग नोंदवला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूकीचे नियोजन, आढावा बैठकांचे आयोजन केले. भाजप नेते आमदार प्रविणजी दरेकर, तत्कालीन भाजयुमो प्रदेशाध्यक्ष आमदार विक्रांतजी पाटील, मा. शहराध्यक्ष जगदीशजी मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या माध्यमातून **पदवीधर मतदार नोंदणी** व निवडणूक काळातील **बूथ नियोजन** यात सक्रिय सहभाग घेतला.

# पंतप्रधानांच्या सभेचे दिमाखदार आयोजन

माननीय **पंतप्रधान नरेंद्रजी मोदी** यांच्या विचारांनी देशातील प्रत्येक नागरिक प्रभावित आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ पुणे येथील सभेतून त्यांनी जनसामान्यांशी संवाद साधला. या सभेच्या **आयोजनात खारीचा वाटा** उचलण्याची जबाबदारी राघवेंद्र बाप्पु मानकर व त्यांच्या सहकाऱ्यांना मिळाली. पुणे शहरातील हि एक विशाल सभा म्हणजे **अविस्मरणीय सोहळा** ठरला. जनसामान्यांचा उदंड प्रतिसाद आणि सभेचे शिस्तबद्ध नियोजन यामुळे मा. पंतप्रधानांची सभा यशस्वी झाली.





# विजय संकल्प गुढी..

मोदी सरकारच्या यशस्वी कार्यकाळानंतर **२०१९ च्या निवडणुकीत** पुन्हा एकदा **मोदीजी पंतप्रधान** व्हावेत व महाराष्ट्रात महायुतीचे जास्तीत जास्त खासदार निवडून यावेत यासाठी विजय संकल्प करण्यात आला. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर **विजय संकल्प गुढी** उभारण्यात आली. या कार्यक्रमाला दिवंगत खासदार गिरीशजी बापट, केंद्रीय मंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ व भाजपसह महायुतीचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संघटनेसाठी सज्ज 'युवा वॉरियर्स'

तत्कालीन प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखरजी बावनकुळे व भाजयुमो प्रदेशाध्यक्ष विक्रांतजी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली **'युवा वॉरियर्स'** ही संकल्पना राबविण्यात आली. याचा शुभारंभ पुण्यातून करण्यात आला. पुणे शहरातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात युवा वॉरियर्सच्या शाखांचे **मा. बावनकुळे साहेबांच्या** उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी **युवाशक्तीचे महत्व** अनेकदा अधोरेखित केले आहे. सक्षम भारताच्या निर्मितीसाठी, सक्षम युवकांचे संघटन या उपक्रमाच्या माध्यमातून झाले. चांगले युवक राजकारणात आल्याने, देशाला चांगले नेतृत्व मिळेल या उद्देशातून हा उपक्रम राबविण्यात आला.














# कार्य अहवाल प्रकाशन

**भारतीय जनता युवा मोर्चा**चे राघवेंद्र बाप्पु मानकर शहराध्यक्ष असताना, या कार्यकाळातील त्यांच्या सर्व **सहकाऱ्यांनी केलेल्या कामाचा** लेखाजोखा कार्यअहवालाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी केला. या पुणे भाजयुमोच्या टीमच्या दोन वर्षांची झंझावती कारकीर्द असलेला **कार्यअहवालाचा प्रकाशन सभारंभ** तत्कालीन शहराध्यक्ष मा. आमदार जगदीशजी मुळीक, शहराध्यक्ष धीरजजी घाटे, तत्कालीन भाजयुमो शहराध्यक्ष करणजी मिसाळ, निवेदितताताई एकबोटे व भाजयुमोचे सहकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

भाजपा





राहो सदा प्रज्ज्वलीत अंतरी,
दीप निरंतर सेवा भावनेचा...
आजन्म आता अखंड राहो,
हा प्रवास मानवतेच्या सेवेचा...

# दातृत्व



समाजाच्या **विविध स्तरातील घटक** हे समाजाला समृद्ध करतात. प्रत्येकाचे कर्तव्यदक्ष राहणे हे आपल्याही नकळत एक सक्षम समाज घडवतात. अशा प्रत्येक घटकांप्रती आपला **कृतज्ञताभाव सदैव जागृत** राहिला पाहिजे. तसेच सामाजातील अनेक वंचित घटकांसाठी मदत म्हणून आपल्याला सदैव खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. सेवा भावनेचा हा दीप आपल्या अंतरात सदैव जागृत ठेवायचा आहे आणि आजन्म **मानवतेची सेवा** करायची आहे.





# दिवस यमगरवाडीतील सेवाकार्याचा..

समाजातील वंचित, गरजू लोकांसाठी आपण **खंबीरपणे उभे** राहावे ही भावना सदैव मनात जागृत आहे. या भावनेनेच हिवाळ्यात गरजू, बेघर लोकांना ब्लँकेट वाटून मानवतेची सेवा करण्याची संधी लाभली. समाजातील अशा वंचित लोकांसाठी कायमच पुढाकार घेऊन **सेवेचा हात** देण्याचा नेहमी राघवेंद्र बाप्पु मानकर यांचा प्रयत्न असतो. **यमगरवाडी** (ता. तुळजापूर) येथील वंचित विकास प्रतिष्ठानच्या एकलव्य विद्या संकुल येथे भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी वाढदिवसानिमित्त भेट आलेल्या ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.










# महाप्रसाद भक्तीचा..

गेल्या ४ वर्षांपासून **सद्गुरु शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त** मुक्तद्वार महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी सुमारे **२५ हजार नागरिकांनी** या महाप्रसादाचा लाभ घेतला. बाजीराव रस्त्यावरील नूतन मराठी विद्यालय याठिकाणी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. श्रद्धा आणि भक्तीभाव यांचा संगम असणारा हा **सोहळा** नावारूपाला आला आहे.





# हो तयांचा सोबती...

समाजातील प्रत्येक घटकासाठी आपण काम केले पाहिजे ही **माणुसकीची** भावना जपत दिव्यांग बांधवांना आवश्यक साहित्य वाटप केले. मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहराध्यक्ष मा. धीरजजी घाटे यांच्या हस्ते हे साहित्य वाटप करण्यात आले. तसेच प्रभागातील गरजू रुग्णांना तातडीच्या **रुग्णसेवेसाठी** स्व. खासदार गिरीशभाऊ बापट व रा. स्व. संघाचे दिवंगत प्रचारक संदीपजी आठवले यांच्या स्मरणार्थ राघवेंद्र बाप्पु मानकर मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून कॅबिनेट मंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांच्या उपस्थितीत **रुग्णवाहिका** उपलब्ध करून देण्यात आली.






# रक्तदान महायज्ञ

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. अनेकदा कठीण प्रसंगी रक्तदात्यांची गरज असते, वेळेवर ते मिळणे आवश्यक असते. हा हेतू कायम डोळ्यासमोर ठेवून सातत्याने **रक्तदान शिबीराचे** आयोजन करण्यात येत आहे. दिनविशेषाचे औचित्य साधून आयोजित केल्या जाणाऱ्या रक्तदान शिबीराच्या माध्यमातून **गरजूंसाठी ब्लड बॅग** उपलब्ध करून देण्यात येतात. रक्तदानाविषयी जनजागृती सातत्याने करण्यात येते. प्रभागातील सर्वसामान्य नागरिकांचा या रक्तदान शिबीरास **उदंड प्रतिसाद** कायमच लाभला आहे.या सातत्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या प्रभागातून अनेक रक्तदाते तयार झाले आहेत.

# गरजूंना अन्नदान..

**कोविड काळात** अनेक गरजूंना दोन वेळचे अन्न मिळणे अवघड झाले असताना बाप्पु मानकर यांनी **स्वतः जेवण तयार करत**, अन्नदानासाठी यंत्रणा उभी केली. सणस मैदान कोविड सेंटर येथे असलेल्या रुग्णांसाठी अन्न पुरवण्याबरोबरच शेकडो विद्यार्थी, श्रमिक यांना रोज ताज्या जेवणाचा पुरवठा केला. याकाळात एकूण २ लाखांहून अधिक नागरिकांना **अन्नपुरवठा** करण्यात आला.





# राजकीय वातावरणात संवेदनशीलता..

महाविकास आघाडी सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे **एसटी कर्मचाऱ्यांचा** अनेक महिन्यांचा पगार रखडला होता. त्यामुळे हजारो एसटी कर्मचारी संपावर होते. एकीकडे आंदोलन, दुसरीकडे रखडलेला पगार यामुळे या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर **उपासमारीची वेळ** आली होती. अनेक कुटुंबांचे महिन्याचे रेशनही भरले गेले नव्हते. राजकीय दृष्टिकोन बाजूला ठेऊन या विषयात मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार करीत, भारतीय जनता युवा मोर्चाच्या माध्यमातून राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी या **कुटूंबाना रेशन किट** उपलब्ध करून दिले.

# वारसा शताब्दीचा, वसा सेवेचा..

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** यंदा शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. संघाचा स्वयंसेवक म्हणून मिळालेली संस्कारांची शिदोरी, **सेवेची शिकवण** ही समाजकार्याचा पाया मजबूत करते असे मानणारे राघवेंद्र बाप्पु मानकर हे दरवर्षीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वर्धापनदिन अर्थात **विजयादशमी संचलनात सहभागी** होतात. यंदाच्या शताब्दी वर्ष संचालनातही सहभागी होऊन, या संचलनाचे स्वागत राघवेंद्र बाप्पु मानकर मित्र परिवाराच्या माध्यमातून करण्यात आले.



भाजपा

संघ शताब्दी वर्ष





# तृषाशांती; सेवा तहानलेल्यांची..




आपला प्रभाग २५ म्हणजे, शहराच्या **मध्यवस्तीचे ठिकाण** व मुख्य बाजारपेठ आहे. या भागातील प्रमुख २० ठिकाणी **'तृषाशांती'** हा उपक्रम राबवून पाणपोईची सोय करण्यात आली होती. प्रभागातील **दिवंगत नागरिकांच्या स्मरणार्थ** या 'तृषाशांती' पाणपोईंचे लोकार्पण करण्यात आले. आपल्या भागातील नागरिक, व्यवसायिक, श्रमिक व खरेदीसाठी येणार हजारो नागरिक यांना उन्हाळ्याच्या वातावरणात **थंडगार पाण्याचे जार उपलब्ध** करून देण्यात आले होते.











# ‘जन्मदिन’ सेवकार्याच्या आनंदाचा..

वाढदिवस हा वैयक्तिक आनंदापेक्षा सामाजिक **बांधिलकीचा दिवस** आहे, या विचारातून बाप्पु मानकर दरवर्षी वाढदिवसानिमित्त **समाजाभिमुख** उपक्रम राबवतात. रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी, गरजूंना मदत यांसारख्या उपक्रमातून साजरा केलेला वाढदिवस हा खरा आनंददायी दिवस ठरतो अशी त्यांची धारणा. वाढदिवसाच्या दिवसाची सुरुवातच न चुकता श्री स्वामी समर्थ मठात **अन्नदानाने** होते. दरवर्षी भेटवस्तू व पुष्पगुच्छ न आणता, थंडीसाठी उपयुक्त कपडे आणण्याचे आवाहन केले आणि तब्बल १५०० गरजूंसाठी ब्लँकेट, स्वेटर, कानटोपी उपलब्ध केले. अनाथ आश्रमातील चिमुकल्यांसोबतचे सेलिब्रेशन, ज्येष्ठांसाठी उपक्रम हे त्यांचा वाढदिवसाचे खरे सेलिब्रेशन असते.













# अहोरात्र जनसेवेला समर्पित; २४ तास जनसेवा कार्यालय

प्रभागातील नागरिकांना कोणतीही समस्या आली तरी **अहोरात्र सेवा** मिळावी या हेतूने २४x ७ जनसेवा कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. सर्वसामान्यांच्या सेवेसाठी **सदैव तत्पर** असणाऱ्या **'टीम आपला बाप्पु'** ने महिला, वृद्ध, विद्यार्थी, युवक, युवती या सर्वांसाठी सेवेचा हात पुढे केला आहे. समस्या कोणतीही असो त्यावर २४x ७ जनसेवा कार्यालय हेच आहे उत्तर.




२४x७ जनसेवा कार्यालय

## २९६०+

दिवसांपासून अखंडपणे कार्यरत

## ६ हजार+

अधिक नागरिकांची सेवा

## ९ हजार+

समस्या व कामांची पूर्तता





उत्सव भक्तीचा,
उत्सव जनसामान्यांचा...
उत्सव ऊर्जेचा,
उत्सव एकात्मतेचा...

# सार्वजनिक गणेशोत्सव, जागर एकात्मतेचा!



















# संस्कृतीने समृद्ध,
# आपला प्रभाग २५
## शनिवार पेठ- महात्मा फुले मंडई

मंदिर सिटी पोस्ट खालकर तालीम
मंडई गणपती **केसरी वाडा**
**ओंकारेश्वर** लाईट मार्केट
रहाळकर राम मंदिर
गुपचूप गणपती बेलबाग चौक
देसाई बंधू आंबेवाले
निंबाळकर तालीम
शनिवार वीर मारुती
**तुळशी बाग** मोदी गणपती
सकाळ ऑफिस **दत्त मंदिर दगडूशेठ**
**भाऊसाहेब रंगारी** भिकारदास मारुती मंदिर
पासोड्या विठोबा **अहिल्यादेवी शाळा** रमण बाग
नगरकर तालीम भावे हायस्कूल
भिडेवाडा स्मारक **गुरुजी तालीम** प्रभा विश्रांतीगृह
भानू विलास टॉकीज चिमण्या गणपती **काळा हौद**
श्री मिसळ **काळी जोगेश्वरी** राज्य शैक्षणिक संशोधन परिषद
भारत इतिहास संशोधक मंडळ **ग्रीन बेकरी** रानडे बालक मंदिर




भाजी राम मंदिर **मंडई मेट्रो स्टेशन** पत्र्या मारुती मंदिर
**श्री तांबडी जोगेश्वरी** नाना वाडा
तुळशीबाग राम मंदिर वीराची तालीम
चिंचेची तालीम **रेणुका स्वरूप**
**विश्रामबाग वाडा** साहित्य परिषद
शिंदे पार दगडूशेठ
कावरे आईस्क्रीम पुणे विद्यार्थी गृह
वर्तक बाग **भारतीय मजदूर संघ**
कुंजीर तालीम नविन मराठी शाळा
लक्ष्मी विष्णू मंदिर
**शनिवारवाडा** ज्ञान प्रबोधिनी
राजा दिनकर केळकर संग्रहालय
न्यू पूना बेकरी सुजाता मस्तानी
स्वामी समर्थ मठ श्रीकृष्ण मिसळ
**आप्पा बळवंत चौक** खजिना विहीर
महाराणा प्रताप उद्यान
जैन मंदिर सदाशिव पेठ
बेडेकर मिसळ लक्ष्मी नरसिंह मंदिर
मेडिकल मार्केट **शनिपार मंदिर**
नागनाथ पार खुन्या मुरलीधर मंदिर
**संभाजी उद्यान मेट्रो स्टेशन**


२४x७ जनसेवा कार्यालय

# राज्य सरकारचा भाजपकडून निषेध



बालगंधर्व चौक : केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना अटक केल्याच्या निषेधार्थ भाजपने महाविकास आघाडी विरोधात आंदोलन केले.



# पाटील यांच्या समर्थनार्थ आंदोलन

भाजप कार्यकर्त्यांकडून शाई हल्ल्याचा निषेध व्यक्त

# भाजपची शहर कार्यकारिणी अखेर जाहीर



# मोदी सत्तेनंतरच भारत खऱ्या अर्थाने स्वतंत्र

खासदार तेजस्वी सूर्या यांचे मत



# पक्ष कार्यालयांबाहेर कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष

पुणे : पुढारी वृत्तसेवा केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मुख्यमंत्र्यांविरोधात केलेले वादग्रस्त वक्तव्य आणि त्यावरून त्यांना झालेली अटक याचे पडसाद मंगळवारी पुण्यातही उमटले. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयासमोर कोंबड्या सोडत राणेंच्या वक्तव्याचा निषेध केला, तर भाजपने शिवसेनेच्या पक्ष कार्यालयाबाहेर मांजराला





# भाजप पर्वती युवा मोर्चाची कार्यकारिणी जाहीर



महर्षीनगर : कार्यकारिणीमध्ये निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देताना मान्यवर.

# संभाजी महाराज 'धर्मवीर'च

'हिंदू जनआक्रोश मोर्चा'दरम्यान आ. शिवेंद्रराजे भोसले यांनी केले स्पष्ट





# BJP demands opening of temples across state





# बँक कर्मचाऱ्यांनी सांभाळले आर्थिक आरोग्य : डॉ. कराड

# भाजपने मांजराला पाजले दूध



# राडा

# मॉल्समध्येही शिवजयंती साजरी करा

भारतीय जनता युवा मोर्चाची मागणी



# संघ योगदानाची शिकवणी घेऊ

'भाजयुमो'चे अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांचे टीकाकारांना प्रत्युत्तर

# विविध रथ, ढोल-ताशा पथक अन् शंखनाद

## गुढीपाडव्यानिमित्त शहरात मिरवणूक : पुणेकरांचा उत्साहात सहभाग







## विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी भाजयुमोचा आंदोलनाचा इशारा

# सर्वधर्मीयांची प्रार्थनास्थळे खुली करा



# भाजपच्या नवीन कार्यालयात स्नेहमेळावा



### शरद मोहोळच्या पत्नीने घेतली भेट

# संभाजी महाराजांचा बलिदान दिन 'धर्मवीर दिन' घोषित करा











## 'बँक कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे'



पुढारी


# लव्ह जिहादविरोधात एल्गार





# स्वरदा बापट, राघवेंद्र मानकर शहर कार्यकारिणीत

# सामूहिक रामरक्षा पठणासाठी नागरिक सज्ज





भाजपतर्फे आनंदोत्सव साजरा...



## शेकडो विद्यार्थ्यांची परीक्षेसाठी पायपीट



हिंदू जन आक्रोश मोर्चात सहभागी झालेले नागरिक. (छाया : आशिष काळे)

# हिंदू धर्मरक्षणासाठी एकवटल्या संघटना

## आक्रोश मोर्चात उत्स्फूर्त सहभाग




## एसएससी बोर्ड के कामकाज का विरोध करके भाजयुमो ने विभागीय अध्यक्ष का घेराव किया

शिवाजीनगर, 23 जुलाई (आ.प्र.)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक और उच्च माध्यमिक शिक्षा मंडल के द्वारा 11वीं कक्षा में प्रवेश के लिए ली जाने वाली सीईटी परीक्षा के लिए नाम रजिस्ट्रेशन करने की वेबसाइट में आई तकनीकी खराबी को शीघ्र ठीक कराए जाने और बोर्ड के मनमाने कामकाज का विरोध करते हुए भाजपा युवा मोर्चा ने मंडल के विभागीय अध्यक्ष तुकाराम सुपे का शुक्रवार को घेराव किया. मोर्चा के नेतृत्व में भाजपा युवा मोर्चा के अध्यक्ष राघवेंद्र मानकर, महासचिव प्रतीक देसरडा, दीपक पवार, राजू परदेशी, सुनील मिश्रा, शिवाजीनगर युवा मोर्चा अध्यक्ष अपूर्व खाड़े, अमित कंक और दुष्यंत मोहोल शामिल हुए. इस अवसर पर राघवेंद्र मानकर ने कहा कि, दसवीं परीक्षा का रिजल्ट घोषित होने पर सर्वर क्रैश हो गया था. इस कारण करीब 15 लाख 75 हजार विद्यार्थियों को परिणाम देखने में 4 से 8 घंटे तक का समय लगा. कक्षा 11वीं में प्रवेश के लिए ली जाने वाली सीईटी परीक्षा की वेबसाइट तकनीकी कारण से दो दिनों से बंद पड़ी है. उन्होंने कहा, तकनीकी खराबी शीघ्र ठीक करवाकर विद्यार्थियों को वेबसाइट उपलब्ध कराएं, रजिस्ट्रेशन का समय बढ़ाया जाए वर्ना तीव्र आंदोलन किया जाएगा. अब कक्षा 12वीं के विद्यार्थियों के आंतरिक मूल्यांकन अंक का सर्वर डाउन होने के कारण रिजल्ट आने में देरी होने की आशंका निर्माण हो गई है.










महायुती









# भारतीय जनता पार्टी कशासाठी..?

# पुण्याचे प्रगतीपर्व

» **मेट्रोचे स्वप्न उतरले सत्यात !**
चारही दिशांना मेट्रोचा विस्तार

» **किफायतशीर, पर्यावरणपूरक बससेवा**
विद्यार्थी, महिला, ज्येष्ठांना प्राधान्य

» **शहराला मुबलक आणि समान पाणीपुरवठा**
सर्वांना चोवीस तास, समान पाणी

» **आधुनिक, वेगवान पुण्यासाठी**
१७० किलोमीटरच्या रिंगरोगडचे काम वेगाने सुरू

» **सुलभ वाहतुकीसाठी नेटके नियोजन**
वेळेच्या बचतीसाठी उड्डाणपुलांची उभारणी

» **पुणे विमानतळाला नवे टर्मिनल**
पुरंदर येथील आंतरराष्ट्रीय विमानतळास गती

» **शहराची सर्व प्रवेशद्वारे कोंडीमुक्त**
**पूर्व + पश्चिम + उत्तर + दक्षिण**
चोहो बाजूने रस्त्याचे काम प्रगतीपथावर

» **जलसंस्कृतीचे पुनरुज्जीवन**
मुळा-मुठा नदीचे पुनरुज्जीवन

» **क्रीडा संस्कृतीला चालना**
उपनगरांसह शहरात एकूण सुमारे दीड लाख चौरस मीटर क्षेत्रावर विविध क्रीडा सुविधांचे निर्माण

» **नागरिकांच्या आरोग्यासाठी**
पुणे महापालिकेचे 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय' कार्यान्वित

» **जुन्या गावांना, नवा चेहरा**
महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या विकासासाठी नियोजनबद्ध प्रयत्न

» **स्वच्छ, कचरामुक्त पुण्यासाठी**
दररोज तयार होणाऱ्या कचऱ्यावर संपूर्णपणे प्रक्रिया

» **सबका साथ, सबका विकास**
प्रधानंत्री आवास योजनेतून २६ हजार ७४२ घरांसाठी अनुदान

» **तरुणाईच्या दमदार करिअरसाठी**
२०१७ पासून आजवर २० हजारांहून अधिक युवक-युवतींना थेट नोकरीची संधी

## पाठीशी खंबीरपणे उभे राहा.
## माझे लढण्याचे बळ तुम्हीच सर्वजण आहात,
## तुम्हा सर्वांची खंबीर साथ हवी आहे.

भाजपा

पुणे शहर हे महाराष्ट्राचा सांस्कृतिक, शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्रबिंदू ठरत आहे. पुणे शहर आता एक 'मेट्रो सिटी' म्हणून ओळखले जात आहे. या शहराची खरी ओळख आहे ती आपला प्रभाग क्र २५. जगाच्या पाठीवर पुणे शहराची ओळख म्हणजे पुणे ३० अशीच आहे. शहराची ओळख असलेल्या आपल्या प्रभागाला अधिक सुंदर करण्याचा  माझा प्रयत्न आहे. पुणे शहराचा झपाट्याने विकास होत असताना प्रभाग क्र. २५ मध्ये अनेक नाविन्यपूर्ण बदल घडणार आहेत. या बदलांना सामोरे जात असताना आपल्या परंपरा, संस्कृती यांचे जतन करत काळासोबत आपल्याला पुढे जायचे आहे.

भारतीय जनता पक्षाने प्रभाग क्र. २५ चा विकास घडवलेला आहे. आता इथून पुढे या विकासाचा नवीन टप्पा सुरु होणार आहे. या विकासपर्वामध्ये आपल्याला महिला, मुले, वृद्ध यांच्यासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देतानाच मूलभूत गरजांसोबतच अनेक दीर्घकालीन योजना राबवायच्या आहेत.

पुणे म्हणजे शिक्षणाचे माहेरघर. आणि या शहराचा शैक्षणिक केंद्रबिंदू हा आपला प्रभाग क्र. २५ आहे. इथे अनेक विद्यार्थी राहतात. महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या या विद्यार्थी वर्गासाठी सुयोग्य नियोजित सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत. तसेच शहराच्या विकासासोबत आपल्या प्रभागात पुनर्निर्मितीला चालना देऊन प्रभागातील नागरी सुविधांचे योग्य नियोजन करायचे आहे. ट्रॅफिकच्या समस्येवर दीर्घकालीन उपाययोजना करायच्या आहेत. महिला सुरक्षा, महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, प्रभाग स्वच्छता, आरोग्य, सांस्कृतिक, क्रीडा या सर्वच क्षेत्रात आपल्या प्रभागाची कामगिरी कायमच अग्रेसर ठेवायची आहे.

आपला प्रभाग हा एक आदर्श प्रभाग म्हणून पुणे शहरात ओळखला जावा याकरिता मी सदैव कटिबद्ध राहीन. पुणे शहराच्या विकासाच्या महायज्ञामध्ये माझ्या लोकसेवेच्या समिधा मी अर्पण करत आहे. आता गरज आहे ती आपल्या सर्वांच्या विश्वासाची.

आपण सर्वजण मिळून आपला प्रभाग हा एक आदर्श प्रभाग घडवूया.

कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून भारतीय जनता पक्षाला विजयी करूया.




सदैव सेवेसी तत्पर
आपला बाप्पु
@BapuMankarBJP bapumankar.com 8381 079 079
राघवेंद्र बाप्पु मानकर
चिन्ह : कमळ
कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा.